# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

**क्रमांक : मप्रनि/ सस (तां)/ म-** २६८

**दिनांक :** २०.०५.२०१५.

**प्रति,**
**श्री.जॉय ठाकूर,**
शास्त्रज्ञ श्रेणी-२,
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
१५ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२.

विषय : पालघर जिल्हयातील प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभुल करुन चुकीच्या पध्दतीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत......

संदर्भ : १. आपले पत्र क्र. मप्रनि-२०१५/ संदर्भ-७०/ तां.क.२, दि.२८.०४.२०१५.
२. मा.मुख्यमंत्री / मा.मंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेले श्री.आनंद राजेंद्र ठाकुर, सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद यांनी लिहिलेले पत्र दि.२४.०२.२०१५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकीत पत्राच्या अनुषंगाने, उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३ यांनी दि.०२.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर अहवाल मुख्यालयात सादर केला असून त्याची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

सदर अहवालामध्ये उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३ यांनी असे नमूद केले आहे की, सदर उद्योगास संमतीपत्र देतांना त्यावेळी लागु असलेल्या नदी गुणवत्ता सुधारणा धोरणाच्या तरतुदींचे उल्लंघन झालेले नाही.

आपल्या माहितीस्तव.

स्थळ प्रत मा.सदस्य सचिव यांनी मान्य केली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(पुं.कि.मिराशे)
सहायक सचिव (तांत्रिक)

**प्रत,**

**खाजगी सचिव,** मा.मंत्री, पर्यावरण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

# महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

उप–प्रादेशिक कार्यालय, कल्याण ३

फोन नं. ०२५१–२३१०१६७
०२५१–२३१०२१२
फॅक्स नं. ०२५१– २३१०१९२

सिध्दीविनायक संकुल,
तिसरा व चौथा मजला,
ओक बाग, स्टेशन रोड,
कल्याण (प.)–४२१ ३०१.

जा.क्र. मप्रनि/उप्राकाक–३/ 2०८

दि. 2/ 5/ २०१५

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ,
कल्याण.

150507FT0208
150507FT0209

विषय:– पालघर जिल्हयातील प्रदुषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभुल करून चुकीच्या पध्दतीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणेबाबत.

संदर्भ:– श्री. आनंद राजेंद्र ठाकुर, सदस्य महाराष्ट्र विधान परिषद यांचे पर्यावरण मंत्री महोदय यांना पत्र दिनांक २४.०२.२०१५, या कार्यालयास प्राप्त दिनांक २०.०४.२०१५.

महोदय,

उपरोक्त संदार्भाकित पत्र या कार्यालयास ई–मेलद्वारे दिनांक २०.०४.२०१५ रोजी मिळाले. सदर पत्रामध्ये, मे. इकोरिच कॉस्मॅटिक्स इंडिया प्रा. लि. या कारखान्यास, वैतरणा नदीच्या जवळ स्थित असतानासुध्दा नियमबाहय पध्दतीने संमतीपत्र दिले गेल्याचे म्हटले आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने खालील सही करणार उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण ३ व क्षेत्र अधिकारी श्री. प्रमोद लोणे यांनी दिनांक १७.०४.२०१५ रोजी कारखान्यास भेट दिली. भेटीचा अहवाल सोबत जोडला आहे.

भेटी दरम्यान मसाज ऑईलचे उत्पादन सुरू होते. उत्पादन प्रक्रियेमध्ये पॅराफिन ऑईल व इतर ॲडीटिव्स यांचे ब्लेंडींग केले जाते. सदर उत्पादन हे ट्रायल स्वरूपाचे असल्याची माहिती मिळाली. औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता प्राथमिक स्वरूपाची सयंत्रणा बसविली असून, प्रक्रियाकृत सांडण्याचा वापर बागबगीचा करिता केला जातो. कारखान्याने उद्योग चालु करण्यास (Consent to Operate) संमतीपत्रकरिता अर्ज केला आहे.

सदर उद्योगाचे स्थान गुगल मॅप्स या संकेतस्थळावरून पाहिले असता, वैतरणा नदीपासुनचे अंतर सुमारे २.१ कि.मी. इतके असल्याचे दिसुन येते. ज्यावेळी उद्योगास मंडळाने उद्योग उभारणीकरिता मंडळाने संमतीपत्र दिले होते, त्यावेळेस राज्यामध्ये नदी गुणवत्ता सुधारणा धोरण (RRZ policy Dated 13.07.2009) लागु होते. सदर धोरणामधील तरतुदीअंतर्गत वाडा तालुक्यातील

वैतरणा नदीचा भाग हा ए—२ प्रकारात समाविष्ट होता. यानुसार नारंगी संर्वगातील सदर उद्योग नदीकिना—या पासून १ कि.मी. च्या पुढे असणे आवश्यक होते.

त्यामूळे सदर कारखान्यास संमतीपत्र देताना नदी गुणवत्ता सुधारणा धोरणाच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सध्यस्थितीत नदी गुणवत्ता सुधारणा धोरण (RRZ policy Dated 13.07.2009) रद्द झालेले आहे. वैतरणा नदी किना—यापसून कारखान्याच्या अंतराचे प्रमाणपत्र पाटबंधारे विभागाकडून प्राप्त करून घेणेबाबत सुचना उद्योगास देण्यात आल्या आहेत.

सदर ~~सदर~~ तक्रारीबाबत अहवाल वरिष्ठ कार्यालयास आपल्या स्तरावर कळविण्यात यावा ही विनंती. आपल्या माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता सादर.

आपला विश्वासू,

सुजीत ढोलम
02/04/2014

(सुजीत ढोलम)
उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण ३

सोबत :— वरिलप्रमाणे.

प्रत माहितीकरिता सादर :—

१. सह संचालक (तांत्रिक), म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई.
२. प्रधान वैज्ञानिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई.

Singh
MS
AS(T)

४

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. २२८१९५१७
फॅक्स क्र. २२०२५९४६.
ई-मेल . secofftc२@gmail.com

क्रमांक- मप्रनि २०१५/ संदर्भ ७० /तां.क.२
**पर्यावरण विभाग,**
१५वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक २५/४/२०१५

M. P. C. BOARD
Inward Section
150506170335
Sion, Mumbai-22.

प्रति,
सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई.

विषय : पालघर जिल्हयातील प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभूल करुन चुकीच्या पध्दतीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणेबाबत...

श्री. आनंद राजेंद्र ठाकूर, वि.प.स. यांचे दि.२४.२.२०१५ चे पत्र.

महोदय,

विषयांकीत बाबी संदर्भात श्री. आनंद रा. ठाकूर, वि.प.स. यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक २४.२.२०१५ च्या तक्रार अर्जाची प्रत आपणाकडे सत्वर अभिप्रायास्तव पाठविण्यात येत आहे.

(जॉय ठाकूर)
शास्त्रज्ञ श्रेणी-२

y

60
प्रमाणे
2231
26/3/2015

मुख्यमंत्री सचिवालय
टपाल शाखा
4P 2 6 FEB 2015
914304
ई ऑफिस क्र.______

# आनंद राजेंद्र ठाकूर

सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद

प्रति,

**मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब**

मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-३२

24 FEB 2015

**विषय:- पालघर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभूल करून चुकीच्या पद्धतीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणेबाबत...**

मा.महोदय,

वरील विषयान्वये, पालघर जिल्ह्यातील (ता.पालघर) पूर्व भागातील गोऱ्हे गाव येथे इकोरीच्या कॉस्मेटीक इंडिया प्रा.लि. कंपनीचे काम सुरू असून औद्योगिक बिनशेती जमीन व कंपनी सुरू करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा दाखला लागतो. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनी जवळून कोणती नदी वाहते याची शहानिशा न करता २० कि.मी.अंतरावर असलेली नदी तानसा दाखवून कंपनीला ना हरकत दाखला दिला आहे. मात्र ज्या ठिकाणी कंपनीचे काम सुरू आहे. त्या गोऱ्हे गावाच्या बाजूने वैतरणा नदी वाहत आहे. वैतरणा नदी व सुरू असलेले काम नियमानुसार बसत नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वैतरणा नदी गायब करून २० कि.मी.अंतरावर वाहणारी तानसा नदी दाखवून नियम धाब्यावर बसवून इकोरीच्या कॉस्मेटीक इंडिया कंपनीला ना हरकत दाखला देऊन शासनाची दिशाभूल केल्याचे उघडकीस आले आहे.

**तरी प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभूल केल्याबद्दल तातडीने कार्यवाही करून वरील कंपनीस दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यास आग्रहाची विनंती.**

कळावे,

आपला विश्वासू

(आनंद राजेंद्र ठाकूर)

मिलिंद म्हैसकर
मुख्यमंत्री यांचे सचिव
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

पत्ता : श्री शिवनिवास, मु. पो. वाणगांव, ता. डहाणू, जि. पालघर, पिन - ४०१ १०३.
ई-मेल - thakuranandr@gmail.com • भ्रमणध्वनी - ०९९८७३३५३११ • टेली / फॅक्स - ०२५२८-२४४८३४

Singh
MS
AS(T)

# महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रमांक ०२२ २२८५२६९६
फॅक्स क्रमांक ०२२ २२०२५९४६

क्रमांक :- संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११३/तां.क.१
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
नवीन प्रशासन भवन,
१५ वा मजला, मुंबई-३२
दिनांक :-29ऑक्टोबर, २०१५

M. P. C. BOARD
Inward Section
151028/H0032
Sion, Mumbai-22.

प्रति,

सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
मुंबई,

विषय :- जि.पालघर, येथील प्रदुषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभूल करून चुकीच्या पद्धतीन दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्र रद्द करणेबाबत
- श्री आनंद ठाकूर, वि.प.स. यांचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात श्री आनंद ठाकूर, वि.प.स. यांचे दिनांक २४.२.२०१५ रोजीचे पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर पत्रान्वये पालघर जिल्हयातील गोऱ्हे गाव येथे इकोरीच्या कॉस्मेटीक इंडीया प्रा.लि. कंपनीचे काम सुरू असुन कंपनी सुरू करण्यासाठी म.प्र.नि.मंडळाने दाखला दिल्याची तक्रार करण्यात आली आहे. सदर तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करून मा. सदस्याना 0कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे, ही विनंती.

आपला,

21/10/1

( का.सु.लंगोटे )
शास्त्रज्ञ श्रेणी-२

सोबत - वरीलप्रमाणे

(३४)

मुख्यमंत्री सचिवालय
टपाल शाखा
HP 26 FEB 2015
914304
ई ऑफिस क्र.

सत्यमेव जयते

# आनंद राजेंद्र ठाकूर

सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद

24 FEB 2015

प्रति,

**मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब**

मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ३२

**विषय :- पालघर जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभूल करून चुकीच्या पद्धतीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणेबाबत...**

मा.महोदय,

वरील विषयान्वये, पालघर जिल्ह्यातील (ता.पालघर) पूर्व भागातील गोऱ्हे गाव येथे इकोरीच्या कॉस्मेटीक इंडिया प्रा.लि. कंपनीचे काम सुरू असून औद्योगिक बिनशेती जमीन व कंपनी सुरू करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा दाखला लागतो. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनी जवळून कोणती नदी वाहते याची शहानिशा न करता २० कि.मी.अंतरावर असलेली नदी तानसा दाखवून कंपनीला ना हरकत दाखला दिला आहे. मात्र ज्या ठिकाणी कंपनीचे काम सुरू आहे. त्या गोऱ्हे गावाच्या बाजूने वैतरणा नदी वाहत आहे. वैतरणा नदी व सुरू असलेले काम नियमानुसार बसत नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वैतरणा नदी गायब करून २० कि.मी.अंतरावर वाहणारी तानसा नदी दाखवून नियम धाब्यावर बसवून इकोरीच्या कॉस्मेटीक इंडिया कंपनीला ना हरकत दाखला देऊन शासनाची दिशाभूल केल्याचे उघडकीस आले आहे.

**तरी प्रदूषण नियंत्रण मंडळाने शासनाची दिशाभूल केल्याबद्दल तातडीने कार्यवाही करून वरील कंपनीस दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यास आग्रहाची विनंती.**

कळावे,

आपला विश्वासू

(signature)

**(आनंद राजेंद्र ठाकूर)**

मा.मु.सचिव (श्री. मैसकर)

प्र.स.(पर्यावरण)

मिलिंद म्हैसकर
मुख्यमंत्री यांचे सचिव
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

मा.क्र. ७

पत्ता : श्री शिवनिवास, मु. पो. वाणगांव, ता. डहाणू, जि. पालघर, पिन - ४०१ १०३.
ई-मेल - thakuranandr@gmail.com • भ्रमणध्वनी - ०९९८७३३५३११ • टेली / फॅक्स - ०२५२८-२४४८३४